दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१३७ बुधवार,दि.२२ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-137 Wednesday, Dt.22 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4



बीड - येथील मानूर मठामध्ये गुरुवर्य विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मानूरकर महाराज नागनाथ देवस्थान यांच्या सानिध्यात करमाळा येथील भक्त सेवानिवृत्त कृषी अधिकारी चंद्रकांत स्वामी आणि वनमाला स्वामी.

# महादेव मुंडेला भोसकून खल्लास केलं, सुरेश धस यांचा नवा गौप्यस्फोट

## पहिल्यांदाच घेतलं आकाच्या मुलाचं नाव!

बीड : एकीकडे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हे प्रकरण ताजे असताना आता आमदार सुरेश धस यांनी महादेव मुंडे हत्या प्रकरण समोर आणले आहे. महादेव मुंडे (चरहरवर्शी चींपवश चींवर्शी उरीश) हा इसम मुळचे कन्हेरवाडीचा होता. त्याची २२ ऑक्टोबर २०२३ रोजी हत्या करण्यात आली होती. त्यांची परळी वैजनाथच्या तहसीलसमोर हत्या करण्यात आली होती. याच प्रकरणात सुरेश धस यांनी नव्याने अनेक गौप्यस्फोट केले असून पहिल्यांदाच आकाच्या मुलाचं नाव घेतलं आहे. तसंच पुढच्या तीन ते चार दिवसात आरोपींना अटक झालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

वाल्मिक कराड यांच्या मुलाचं थेट नाव घेतलं

महादेव मुंडे हे दुधाचा व्यवसाय करायचे.

(उर्वरीत पान २ वर)

### महादेव मुंडेचा चाकू भोसकून खून केला

महादेव मुंडे यांची हत्याप्रकरणात पुढच्या दोन ते तीन दिवसांत आरोपी सापडतात की नाही ते बघा. या महादेव मुंडे यांना जीवे मारून टाकण्यात आलं. यातील आरोपी अटक व्हायला नकोत का? या माणसाच्या जीवाची काही किंमत आहे की नाही. त्याला भोकसून खल्लास करण्यात आलं. त्यांचा रतिबाचा धंदा होता. एवढ्या गरीब माणसाला मारून टाकण्यात आलं.

### सगळ्या एजन्सी आकानेच घेतल्या आहेत

या भागात आकांची दहशत आहे. अजूनही लोक पुढे येत नाहीयेत. लोक बोलतील. अजून बरीच प्रकरणं येणार आहेत. गायछापच्या एजन्सीसह इतरही एजन्सी आकाने घेतलेल्या आहेत. मारवाडी, लिंगायत समाजाची तसेच इतर समाजीच अनेक लोकं आहेत, त्यांच्या एजन्सी या आकाने स्वत:कडे घेतलेल्या आहेत. आता हे लोक तक्रार करायला पुढे येतील, असंही सुरेश धस म्हणाले.





# पोलीसांनी अनेक वाहन धारकांना दंड ठोठावला

**बीड (प्रतिनिधी)**

**जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये आणि रस्त्यावर गाड्या लावण्यास मनाई आहे. तरी अनेक जण गाड्या लावून नियमाचे उल्लघन करत आहे. आज सकाळी रुग्णालयाच्या समोर रस्त्यावर गाड्या आढळून आल्याने पोलीसांनी या वाहन धारकांना दंड ठोठवला आहे.**

जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पुर्वी गाड्या लावल्या जात होत्या. मात्र जिल्हा शल्यचिकित्सकांनी नियमात बदल करुन समोरच्या जागेमध्ये पार्कीगची व्यवस्था केली. जिल्हा रुग्णालयाच्या आवारात गाड्या नसल्यामुळे रुग्णांना व नातेवाईकाना सोयीचे झाले आहे. मात्र काही वाहन धारक रुग्णालयाच्या समोरील रस्त्यावर गाड्या लावू लागले आहे. तेथेही गाड्या लावण्यात मनाई आहे. समोरच्या पार्कीगमध्ये गाड्या लावणे वजी रस्त्यावरच आडव्या तिडव्या गाड्या लावणाऱ्यांना पोलीसांनी आज दंड आकारला आहे.

## हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या

# जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड ।प्रतिनिधी**

हिंदुरुदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते सुनिलजी प्रभू साहेब व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी



समाजपयोगी व गोरगरीब लोकांना उपयोगी पडणारया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी दिली आहे.

दि. २३ /१/२०२५ रोजी सकाळी ठिक ९ वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स बीड येथे हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मानवंदना करतील, तसेच पाली जि.प. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वहया वाटप , कोल्हारवाडी जि.प. शाळेत शालेय साहित्य वाटप,सौंदाना जि.प. शाळेत शालेय साहित्य वाटप,कुटेवाडी जि.प. शाळेत शालेय साहित्य वाटप, जिव्हाळा बेघर केंद्रात पौष्टिक आहार वाटप,बाभुळखुंटा येथे शालेय साहित्य वाटप तसेच

(उर्वरीत पान २ वर)



बीड - येथील मानूर मठामध्ये गुरुवर्य विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मानूरकर महाराज नागनाथ देवस्थान यांच्या शुभाशीर्वादामध्ये पत्रकार वैभव स्वामी यांची पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल तर कला शाखेच्या वतीने कलाशिक्षक गणेश स्वामी पुराणिक यांची आदर्श कलाशिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल समस्त लिंगायत समाज आणि मानूर मठ भक्तांच्या वतीने यथोचित सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या

## १३ सरपंच आणि ४१८ ग्रामपंचायत सदस्यांचं सदस्यत्त्व रद्द

**बीड (प्रतिनिधी)**

परळी पॅटर्न, पीक विमा, हार्वेस्टर घोटाळ्यानंतर आता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जात वैधता पत्र सादर न करणाऱ्या सरपंच आणि ग्राम पंचायत सदस्य यांच्या निवडी रद्द केल्या आहेत. निवडी रद्द केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.यापुढे नवे पालकमंत्री अजित पवार आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यापेक्षा कठोर निर्णय घेण्याची शक्यता आहे.विशेष म्हणजे सोमवारी रात्री उशिरा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडला उशिरा धावती भेट दिली आहे. सरपंचांसह सदस्यांना मोठा दणका बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील १३ सरपंच तर ४१८ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहेत. जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिले आहेत. या आदेशाने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील ४१३ ग्रामपंचायत सदस्य आणि १३ सरपंचाचे सदस्य

(उर्वरीत पान २ वर)

# आरोपी विष्णू चाटेच्या ऑफिसमधील सीटीव्ही फुटेजने पुन्हा खळबळ ?

## मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात वाल्मिक कराड यांच्या सोबत सर्व आरोपी असल्याचे उघड

**बीड (प्रतिनिधी)**

मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा संबंध आवादा कंपनीकडून मागण्यात आलेल्या खंडणीशी जोडला जात आहे. २९ नोव्हेंबरला विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांच्याकडून आवादा कंपनीकडून खंडणी मागण्यात आली होती. त्यादिवशी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांची भेट झाल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे.

हे सीसीटीव्ही फुटेज विष्णू चाटे त्यानंतर आता दुसर्या व्हिडीओमध्येही संतोष देशमुख हत्याप्रकरणात सहभागी असलेल्या वाल्मिक कराडच्या गँगसोबत सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश पाटील दिसून आल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आवादा कंपनीकडून खंडणी मागितली त्यादिवशी राजेश पाटील हे वाल्मिक कराडला का भेटले असावेत, हा प्रश्न

(उर्वरीत पान २ वर)

# सुट्टीवर असतांना पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी पकडली मोबाईल चोरांची टोळी

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले विशेष कौतुक

**बीड /राजयोग प्रतिनिधी**

आज दिनांक २१/०१/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय बीड येथे नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार ब.नं. ४९३ तेजस वाहुळे हे साप्ताहीक सुटी असल्याने अंबाजोगई येथे घरी गेले होते. घरी असतांना दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्यांच्या मुलाला शाळेतुन घेण्यासाठी गेले होते. शाळा सुटण्यास वेळ असल्याने तेजस वाहुळे हे बस स्थानक अंबाजोगई येथे थांबलेले होते. त्यादरम्यान बसस्टॅन्डवर एक बस आल्यानंतर एक इसम बसमध्ये चढणाऱ्या गर्दीचा हिस्सा झाला. परंतु तो गाडीत न चढता परत माघारी फिरुन बाहेर जातांना दिसला. त्यावेळी तेजस वाहुळ यांनी सदर संशयीताने पाकीट मारले असावे असा संशय आल्याने त्यांनी त्याचा पाठलाग केला आणि मोबाईल चोरट्यांची मोठी गँग शिताफीने पकडली. या धाडसी आणि कौतुकास्पद कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

या घटनेची पुढील हकीकत अशी की सदरील इसम व स्थानकामधून पुढे तो कोठे जातो यासाठी पायी पाठलाग केला. त्यावेळी सदरचा इसम हा बस स्टॅन्डच्या बाहेर निघुन गेला. सदर इसमाचे दोन साथीदार सुद्धा त्याला बस स्टॅन्ड परीसरातुन बाहेर उभ्या असलेल्या एका चारचाकीजवळ एकत्र मिळाले.



ते सर्व मिळून चारचाकी वाहनात बसुन घाईत निघाले त्यामुळे पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांचा संशय अधिकच बळावला. तेव्हा त्यांनी मोटारसायकल आणण्यासाठी वेळ न घालवता मागुन आलेल्या रिक्षात बसुन सदर चारचाकी वाहनाचा पाठलाग केला. सदर चारचाकी ही भगवानबाबा चौकातील सीएनजी पंपावर थांबली. त्यावेळी पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी घाई न करता सदर वाहनात किती लोक आहेत याचा अंदाज घेतला असता सदर वाहनातुन ४ इसम खाली उतरले. त्यावेळी तेजस वाहुळे यांनी जवळ जावुन त्यातील मुख्य संशयीतास पकडून त्यास आपण पोलीस असल्याचे सांगुन बस स्टॅन्डवर काय केले? अशी विचारणा केली असता त्याने मोबाईल चोरी केल्याचे सांगीतले. त्यावेळी तेजस

(उर्वरीत पान २ वर)

# गैरहजर अभियंत्यामुळे सर्व पाटबंधारे उपविभागीय कार्यालये वाऱ्यावर

## कार्यालये असून अडचण नसून खोळंबा

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी येथील पाटबंधारे वसाहतीतील कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत उपविभागीय अभियंता, लघु पाटबंधारे, जलसंधारण उपविभागाचे तीन कार्यालये असून या उपविभागातील अभियंते सतत गैरहजर राहत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे हे सर्व कार्यालय म्हणजे असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे या ठिकाणी अधिकारीच हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत.अधिकारी कधी येतात आणि कधी जातात हे त्या कार्यालयात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील माहिती होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांसह अनेक जणांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

शासनाने शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आष्टी येथे कृष्णा खोरे महामंडळाचे उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे शासकीय कार्यालय आहे.या कार्यालया मार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बाबत

(उर्वरीत पान २ वर)




शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# आजचे बालक; उद्याचे पालक!

अलीकडे केवळ स्वबळावर सत्ता येणे पुरेसे समाधानकारक नसते. अशी सत्ता आली की उरल्या-सुरल्या विरोधी पक्षांतील उरल्या-सुरल्या आमदार आदी नेत्यांस आपल्यात घ्यावे लागते. यामुळे गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळते...

राज्याच्या विकासार्थ आवश्यक गुंतवणूक आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस येथे असताना जिल्ह्यांच्या विकासार्थ गुंतवणूक खेचण्याचा अधिकार आपल्या हाती राहावा यासाठी पालकमंत्र्यांची धुसफुस उफाळून यावी; हा विरोधाभास दुर्लक्ष करता येण्यासारखा नाही. ही पालकमंत्रीपदाची परंपरा जिल्ह्याजिल्ह्यांच्या विकासास मारक आणि पालकमंत्र्यांच्या स्व-विकासास किती तारक आहे हे 'लोकसत्ता'ने अलीकडेच दाखवून दिले. त्या वर्णनाची सत्यता इतक्या लवकर हे विकासोत्सुक सत्ताधीश दाखवून देतील असे वाटले नव्हते. पण तसे झाले खरे. याचा अर्थ या सत्ताधीशांस विकासाची आणि त्यातही या विकासाच्या गंगेचे नियंत्रण आपल्या हाती राहावे याची किती आस आहे याचा अंदाज चुकला. तो खरे तर फडणवीस यांचाही चुकला असावा, असे मानण्यास जागा आहे. कारण पालकमंत्रीपदाची पीडा संपवून ते बर्फाच्छादित आल्प्स पर्वतराजीतील दावोस येथे निवांतपणे गेले खरे! पण त्यांचे पाय तिकडे लागलेही नसतील तोच इकडे त्यांच्या राज्यात विकासोत्सुक मंत्रीगणांची अस्वस्थता बाहेर पडू लागली. त्यातही ज्या मंत्रिमहोदयांच्या वाट्यास एकाही जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आलेले नाही ते अधिक अस्वस्थ, असे दिसून आले. विकासापेक्षा विकासाच्या पाळण्याची दोरी आपल्या हाती असावी असा या अस्वस्थांचा हेतू आहे असा याचा अर्थ काही जण काढतील. तो खरा नाही असे म्हणता येणार नाही. 'पालक' होणे म्हणजे पाल्याच्या पाळण्याची दोरी हाती असणे हे जितके व्यक्तीबाबत खरे म्हणता येते तितकेच ते पालकमंत्रीपदाबाबतही खरेच मानायला हवे. आपले पाल्य जसे इतर कोणी वाढवणे व्यक्तींस मंजूर नसते, तसेच आपल्या जिल्ह्याच्या विकासाचा पाळणा अन्य कोणी जोजावणे सत्ताधीशांस नामंजूर असते. हे सत्य लक्षात घेऊन जे झाले त्यावर भाष्य आवश्यक ठरते.

विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सहकाऱ्यांची पालकत्वाची भूक अधिकाधिक कशी भागवता येईल, यासाठी केलेले नावीन्यपूर्ण उपाय लक्षात घेतल्यास या भाष्याची गरज लक्षात यावी. इतके दिवस पालकमंत्रीपदाचे भाग्य एका मंत्र्याच्याच नशिबात असे. फडणवीस यांनी ही अडचण लक्षात घेऊन आपल्या मंत्री सहकाऱ्यांचे नशीब बदलले. त्यामुळे महाराष्ट्रात यापुढे एका पालकमंत्र्याच्या जोडीला सह-पालकमंत्री असतील. अधिक पालक म्हणजे अधिक विकास, असाच हा विचार असणार. मंत्रिमंडळात ज्याप्रमाणे कॅबिनेट मंत्री, त्याखालोखाल राज्यमंत्री, त्याखालोखाल उपमंत्री इत्यादी नेमण्याची सुविधा असते त्याप्रमाणे पालकमंत्रीपदांबाबतही केले जावे. एक पालकमंत्री, त्याची विकासाची भूक शांत करण्यात साहाय्यभूत ठरेल असा सह-पालकमंत्री आणि या सह-पालकमंत्र्यांच्या विकासप्रेरणा भागवण्यास उप-पालकमंत्री अशी त्रिस्तरीय रचना याबाबतही व्हावी. महाराष्ट्र त्या दिशेने पहिले पाऊल टाकू शकतो. नाही तरी या प्रगतिशील राज्याकडे केंद्रीय स्तरावर राबवल्या जाणाऱ्या अनेक योजनांचे जनकत्व आलेलेच आहे. (पाहा : रोहयो, महिला आरक्षण इत्यादी) त्याप्रमाणे ही पालकमंत्री- सहपालकमंत्री- उपपालकमंत्री रचना प्रत्यक्षात आणून महाराष्ट्राने इतरांसाठी पथदर्शक ठरायला हरकत नाही. तसेही सत्ता विकेंद्रीकरण आणि त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य व्यवस्था विकासासाठी आवश्यक मानली जाते. तशीच ही पालकमंत्री रचनाही त्रिस्तरीय असणे योग्य. तसे करणे तार्किकही ठरावे. याचे कारण पालकमंत्री ही संकल्पना मुळात जन्मास आली महाराष्ट्रात. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या काळात या पालकमंत्रीपदाचा उगम. हे नाईक विदर्भातले. विद्यमान मुख्यमंत्री फडणवीस हेही विदर्भातलेच. त्यामुळे पालकमंत्रीपदाची एका वैदर्भीय मुख्यमंत्र्यांनी निर्माण केलेली परंपरा दुसऱ्या विदर्भप्रांतीय मुख्यमंत्र्यांनी अधिक बळकट करणे इष्ट.



बीड महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव स्वामी यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना मोठे बंधू अभिमान अर्बन को क्रेडिट सोसायटीचे मॅनेजर संतोष गंगाधर स्वामी, सौ. जगदेवी संतोष स्वामी, संजिदा, सर्वेश आणि वर्षा वैभव स्वामी.

# मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू; 'दादांचा वादा'

## प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यवतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन

जालना (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माहिती व जनसंपर्क खाते आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी येथे दिले आहे. विविध कार्यक्रमानिमित्त जालना दौर्यावर असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सोमवार (दि २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने 'चित्रकुट' भास्कर आबा दानवे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांना आश्वस्त केले.

प्रसंगी गेल्या अडीच वर्षांपासून वृत्तपत्रांची पडताळणी शासकीय बैठकी अभावी रखडली, दर दोन वर्षांनी दरवाढ अपेक्षित असतांना गेली सहा वर्षात एकदाही दरवाढ नाही, ग्रामीण भागातील पत्रकारांना बस पास अथवा ग्रामीण पत्रकारांसाठी अधिस्विकृती पत्रिकेसाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट रद्द करणे, वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यासह अन्य मागण्यांसंदर्भात निवेदन दिले. उपमुख्यमंत्री यांनी काही मिनीटात विषय समजुन घेत हा विषय माहिती व जनसंपर्क मंत्रालयाचा असून मुख्यमंत्री महोदयांकडे हे खाते आहे. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करु प्रश्न मार्गी लावू असा वादा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केला. प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाच्यावतीने भेटलेल्या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र जोगड सुहास वैद्य, आमेर खान, नरेंद्र जोगड यांचा समावेश होता.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही. राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित



आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा-सात वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, झाली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, या महत्त्वाच्या विषयासह पुढील मुद्यांवर आपल्या स्तरावरुन तातडीने निर्णय घेऊन वृत्तपत्रे व पत्रकारांना न्याय द्यावा.

शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणार्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत प्रत्येकवेळी भेदभाव केल्या जात आहे. प्रसिद्धीस देण्यात येणार्या जाहिराती ह्या मोठे, मध्यम संवर्गासह लघु संवर्गातील दैनिकांना दिल्या जातात. मात्र, लघु संवर्गातील साप्ताहिकांना टाळल्या जात आहे. मे. साहेबांना विनंती आहे की, शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.६ या मुद्द्यात बदल करून सर्व संवर्गातील दैनिक-साप्ताहिक वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. तसेच मागील वर्षभरात शासनमान्य यादीवरील लघु संवर्गातील साप्ताहिकांचा अनुषेश भरुन द्यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.९ या मुद्यानुसार शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना रंगीत जाहिराती, पहिले पान, विशेष पान, नाविन्यपूर्ण जाहिराती देण्यात याव्यात. शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.१० यानुसार दर दोन वर्षांनी दरवाढ करण्याचे आदेश आहेत. ४.५.२ मध्ये नमुद कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे वाढीव दर देण्यात यावे. ( कारण- गेल्या सहा वर्षांपासून एकदाही दरवाढ करण्यात आली नाही.) शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.१ नुसार शासनाच्या अधिनस्त मंडळ-महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्य संस्था आदींना लघु संवर्गातील साप्ताहिकांना जाहिरात देण्याचे बंधनकारक करावे.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी. शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.५ मध्ये बदल करून भुसंपादनाच्या जाहिराती ह्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना प्रसिद्धीस देण्यात याव्यात. तसेच विभागीय माहिती उपसंचालकांकडून देण्यात येणार्या जाहिरातीत लघु संवर्गातील साप्ताहिकास किमान एक जाहिरात देण्यात यावी., शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.७ मध्ये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात ९ व एक ऐच्छिक जाहिरात देण्यात येत आहे. यात सुधारणा करण्यात यावी. व एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात. यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (२५ डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, विजयादशमी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.८ नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी., शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.१२ नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात. एका आर्थिक वर्षात देण्यात येणार्या जाहिराती ह्या ४०० चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात. साप्ताहिकांना देण्यात येणार्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान ५ व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी., ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणार्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात. शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणार्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान ३० दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी. या मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर पीसीएमचे राज्यसरचिटणीस महेश जोशी, जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची स्वाक्षरी आहे.

## अतिवृष्टी अनुदान तात्काळ शेतकऱ्यांना द्या.अ.भा.ग्राहक पंचायतचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



घनसावंगी (प्रतिनिधी)

घनसावंगी तालुक्यात ऑगष्ट ते सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याच्या शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले होते.त्याअनुषंगाने महायुती सरकारने घनसावंगी तालुक्यासाठी १३९ कोटी ११ लाख रुपये एव्हडी रक्कम नुकसान भरपाई म्हणून दिली असून ती रक्कम प्राप्त होऊनही महसूल प्रशासन व कृषि विभाग यांच्या हलगर्जी पणामुळे अद्याप अनुदान याद्या शासनाच्या वेबसाईटवर अपलोड झाल्या नसल्याने अद्याप शेतकरी अनुदानापासून वंचित आहे.तसेच इतर तालुक्यात शेतकऱ्यांना अनुदान मिळणे चालू झाले असून घनसावंगी तालुका मागे असल्याने आज उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकित सिंह यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने निवेदन देऊन शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान तात्काळ देण्याची मागणी केली यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जालना जिल्हा सचिव डॉ. रमेश तारगे,अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे घनसावंगी तालुकाध्यक्ष मारोती सावंत,बाबासाहेब हेमके, राहुल काळे,बन्सी पवार उपस्थित होते.

# गोदावरी विद्यालयात आनंदनगरी मेळावा, विद्यार्थ्यांनी जाणून घेतले व्यावहारिक ज्ञान

घनसावंगी (प्रतिनिधी)

घनसावंगी तालुक्यातील गुरुपिंपरी येथील गोदावरी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय जिवनासोबतच व्यवहारीक ज्ञान देखील मिळावे, म्हणून गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर मामा पवार यांच्या संकल्पनेतून आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी ५२ स्टॉल उभारले होते. दिवसभरात विविध पदार्थाच्या विक्रीतून ३० हजार ५०० रुपयांची कमाई केली. सरपंच भाऊसाहेब साबळे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यवहारीक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते. यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा म्हणून गोदावरी मध्यमिक विद्यालयात आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात शाळेतील तब्बल ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत आपली कला सादर करण्याचा प्रयत्न केला.



मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी घरुनच साहित्य बनवून आणुन शालेय आवारात स्टॉल लावले. विद्यार्थी खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होते. या मेळाव्याला एकप्रकारे बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. यावेळी शाळेचे शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र थोरात, सहशिक्षक गणेश सपकाळ, राहुल मोटे, गणेश वाघुंडे, अमोल सोळुंके,सतीश पाटील, तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक आदींची उपस्थिती होती.

शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञान महत्त्वाचे

शालेय जीवनात शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान देखील येणे गरजेचे आहे. कारण जे शिक्षणातून हूकत असतात त्यांना व्यवसायचे ज्ञान येणे गरजेचे आहे. आयोजित आनंद नगरी मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावून स्वत:हा बनविलेल्या पदार्थाची विक्री करुन त्यातुन दोन पैसे मिळवले हे खरच कौतुकास्पद आहे. संस्थेने राबविलेला हा उपक्रम त्यांना भविष्यात नेहमीच चालना देईल, असे विनोद कोल्हे यांनी सांगितले.

पान १ वरून...

**जात वैधता प्रमाणपत्र...**

रद्द केले आहे.

मुदत उलटूनही जात प्रमाणपत्र सादर नाही

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठीच्या राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र निवडून आलेल्या दिनांका पासून बारा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. मात्र २०२० पासून पुढे झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या अनेक सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. परिणामी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील ४१३ ग्रामपंचायत सदस्य आणि १३ सरपंचाचे सदस्य रद्द केले आहे.

३२ जात वैधता समितींना अध्यक्षाची प्रतिक्षा

दरम्यान राज्यातील जात वैधता प्रमाणपत्र समित्या या विना अध्यक्षच गाडा हाकत असल्याचे समोर येत आहे. राज्यातील ३२ जात वैधता प्रमाणपत्र समितींना अध्यक्षचं नसल्याचा आरोप काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी केला आहे. राज्यात केवळ ४ समित्यांवरच अध्यक्ष असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे जखम डोक्याला आणि इलाज पायाला अशी अवस्था असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तर दुसरीकडे अनेक सरपंच हे या निर्णयाविरोधात हायकोर्टात धाव घेण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

**महादेव मुंडेला...**

पाच ते सहा जणांनी या व्यक्तीला जीवे मारलं. परळी पोलीस ठाण्याचे सानप नावाचे पोलीस अधिकारी होते. महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपींची नावे सानप यांनी शोधली होती. मात्र आकांनी त्यांना पकडायचे नाही, असे सांगितले. त्याऐवजी राजाभाऊ फड आणि अजून दोन चार जणांना अटक करण्याचे सांगितले. पण सानप यांनी त्यास नकार दिला. पुढे सानप यांच्यावर दबाव टाकण्यात आला. पुढे स्वत:हून त्यांनी बदली करून घेतली. मुंडे यांच्या खुनाची घटना २३ ऑक्टोबर २०२३ रोजी झाली. या घटनेतील सर्व आरोपी आकाचे चिरंजीव सुनिल कराड यांच्या अवतीभोवती फरत असतात. रोजच हे त्यांच्यासोबत असतात. अजूनही या आरोपींना अटक करण्यात आलेलं नाही, असा आरोप सुरेश धस यांनी केला.

आरोपी सुनिलच्या आजूबाजूला फिरत आहेत

या माणसाला मारून टाकून अमूक-अमूक व्यक्तीला आरोपी करून का, राजाभाऊ फड यांचे नाव घ्या असे सांगितले जात होते. राजाभाऊ फड हे विधानसभा निवडणुकीसाठी उभे राहणार होते. या प्रकरणातील आरोपींना पकडू नका असे आकाने सांगितले होते. हेच आरोपी आकाच्या मुलाच्या आजूबाजूला फिरत आहेत. आकाचा मुलगा सुनिल आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून हे आरोपी सुनिलच्या आजूबाजूला फिरत आहेत. महादेव मुंडे

पान १ वरून...

यांनी यांचं नेमकं काय काप केलं होतं? याची मला कल्पना नाही. मात्र त्या लोकांनी महादेव मुंडेला मारलं हे मात्र निश्चित, असा गौप्यस्फोट सुरेश धस यांनी केला.

**जयंतीनिमित्त विविध...**

बीड येथील शासकीय रुग्णालयात गोरगरीब रुग्णांना विविध फळ वाटप , रत्नागिरी येथे जि.प. शाळेत शालेय साहित्य वाटप ,जिरेवाडी येथे शालेय साहित्य वाटप ,बीड येथील शनि मंदिर परिसरातील गोरगरीब लोकांना फळ वाटप,तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या वतीने नलावडेसर यांच्या नगर रोडवरील संस्कृती प्रबोधिनी महाविद्यालय येथील ४०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व जेवणाची व्यवस्था केली आहे याबरोबरच जिल्हात व तालुक्यातील विविध ठिकाणी महाआरती,व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे या सर्व कार्यक्रमाला युवा सेना, महिला आघाडी, किसान सेना व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक यांनी हजर रहावे असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले आहे.

**गैरहजर अभियंत्यामुळे सर्व ....**

पाण्याच्या विविध वापरांच्या संदर्भात पाणी फायदे सामान्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे आणि मूल्यांकनासाठी कार्यक्रम घेणे इत्यादी बाबी तसेच सिंचन तलाव,पाझर तलाव, को.प.बंधारे,पक्के बंधारे,वळण बंधारे लघु पाटबंधारे योजनांचे बांधकाम या कार्यालयामार्फत केले जातात मात्र गेल्या अनेक दिवसापासून या कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय लघु पाटबंधारे कार्यालयात प्रभारी म्हणून उप उपविभागीय अभियंता म्हणून कार्यरत असलेले उपविभागीय अभियंता रमेश आडे हे अधिकारी सतत हजर नसल्याने शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत असून या कार्यालयातून कसल्याही प्रकारे शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यावर

शेतकऱ्यांनी प्रस्तुत प्रतिनिधींकडे तीव्र नाराजी व्यक्त केली असून वरिष्ठांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अचानक या ठिकाणी स्पॉट पंचनामा करून अधिकारी का येत नाहीत याची उकल करावी.अधिकारी पगार मात्र घेतात तर कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने शासकीय इमारतही रिक्त राहत आहे.दिवसाढवळ्या या कार्यालयामध्ये एखादा कर्मचारी सोडता कोणीही उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. आष्टीच्या एका उपविभागातील पालवणकर नावाचे अभियंता प्रभारी उप अभियंता नुकतेच निवृत्त झाले आहेत पूर्ण सेवेत असताना देखील कधीही हजर राहिले नाहीत ते आता सेवानिवृत्त झाल्यावर परत हजर झाले त्यांना रोजंदारीवर पूर्ववत कामावर का घेण्यात आला आहे असा सवाल निर्माण झालेला आहे या गैरहजर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**सुट्टीवर असतांना पोलीस ....**

वाहुळे यांनी पोलीसी खाक्या दाखवीला असता त्याचे इतर ३ साथीदार सदर ठिकाणावरुन पळुन गेले. तेजस वाहुळे यांना चारचाकी चालवता येत नसल्याने त्यांनी संशयीतास त्याच्या वाहनाने पोलीस स्टेशनला चालण्यास सांगीतले. तेव्हा संशीयत पोलीस स्टेशनला चलण्यास टाळाटाळ करु लागला तेव्हा तेजस वाहुळे यांना आणखी संशय आल्याने त्यांनी सदर वाहनाची झडती घेतली असता त्यांना सदर वाहनात एकुण ६३ मोबाईल मिळुन आले. तेजस

पान १ वरून...

वाहुळे यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांना फोन करुन घडलेली घटना सांगुन तात्काळ मदत पाठवीण्याबाबत विनंती केली. तेव्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी त्यांना तेथेच थांबुन राहण्याच्या सुचना देवुन त्यांच्या मदतीसाठी तात्काळ अंबाजोगई शहर पोलीस स्टेशनचे अंमलदार पाठवीले.

संशयीत आरोपीस पोलीस स्टेशन येथे नेवुन त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव जगु रामजी खडसे वय-३६ वर्षे रा. लांझाडा पोस्ट डोडम ता. कुही जि. नागपुर ह.मु. प्लॉट नं. १३८ साईबाबा नगर दिघोरी, नागपुर असे सांगीतले. तो त्याचे पर राज्यातील साथीदारांसह विविध शहरात फिरुन चोऱ्या करीत असल्याचे कबुल केले आहे. तसेच तो त्याच्याकडे असलेल्या गाडीचा क्रमांक बदलुन सदर गाडी चोरी करण्यासाठी वापरत असतो. असे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीच्या ताब्यातुन १४,४२,०००/- रुपये किंमतीचे एकूण ६३ मोबाईल व ८,००,०००/- रुपये किंमतीची चारचाकी एक स्वीफ्ट कार बनावट क्रमांक एमएच ४९ सीडी-८०२४ असा असलेली जिचा मुळ क्रमांक एमएच-३१ एफयु-७५२८ असलेली असा एकूण २२,४२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अंबाजोगई शहर पोलीस मिळालेले मोबाईल व इतर ०३ आरोपींचा शोध घेत आहेत.

पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल व उत्कृष्ट कामगीरीबद्दल पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी त्यांचे अभिनंदन केले असुन उद्या दिनांक २२/०१/२०२५ रोजी पोलीस अंमलदार श्री. तेजस वाहुळे यांचा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत हे सत्कार करणार आहे.

पोलीस अंमलदार तेजस वाहुळे यांनी दाखविलेल्या तत्परतेपासुन इतर अंमलदार यांनी प्रेरीत होवुन काम करावे व बीड जिल्हा पोलीस दलाचा नावलौकीक करावा असे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी सांगीतले आहे.

**आरोपी विष्णू चाटेच्या ...**

आता उपस्थित झाला आहे. त्यामुळे आता सीआयडी आणि एसआयटीकडून राजेश पाटील यांची चौकशी होण्याची शक्यता आहे. विष्णू चाटेच्या कार्यालयाबाहेरील सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याप्रकरणी अद्याप पोलिसांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, या सीसीटीव्ही फुटेजमुळे खंडणी प्रकरणात जामीन मिळवण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या वाल्मिक कराड याच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. वाल्मिक कराड याच्या वतीने विष्णू चाटे याने आवादा कंपनीकडे तब्बल २ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. कंपनीच्या अधिकार्यांनी नकार दिल्यानंतर विष्णू चाटे आपल्या सहकार्यांना घेऊन आवादा कंपनीत गेला होता. त्यावेळी तेथील सुरक्षा रक्षकाशी त्याचा वाद झाला. हा सुरक्षारक्षक संतोष देशमुख यांच्या मस्साजोग गावातील होता. त्यामुळे संतोष देशमुख कंपनीत गेले होते. आणि त्यांचा विष्णू चाटेसोबत वाद झाला होता. यानंतर ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.देशमुख यांची हत्या ज्यांनी केली ते सर्व आरोपी हे वाल्मीक कराड यांच्या सोबत एकत्रित असल्याचे सीसीटिव्ही चे फुटेज व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे.

# बनावट चलनी नोटांमध्ये मनिष क्षीरसागर यास अटक

## आठवले गँगचा सहभाग निश्चित,बीड शहर पोलिसांची दमदार कामगीरी

बीड ।प्रतिनिधी

आठवले गँग सोबत सावलीसारखा राहणारा मनीष क्षिरसागर यांच्या घरामध्ये तीन महिन्यापूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत यातील प्रिंटर, बनावट चलनी नोटा, आणि सहभागी प्रमुख आरोपी तात्काळ अटक केली होते. परंतु यातील प्रमुख आरोपी मनिष क्षीरसागर हा पोलिसांना तेव्हापासून गुंगारा देत होता. परंतु बार्शी नाक्यावरील डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्ल्यामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले.



परंतु पुणे येथे अशा प्रकारच्या बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासा संदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यात सुरुवात केली होती.यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मणिष क्षीरसागर याचा कोर्टामार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्टल पुरवले होते. तसेच पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन औरंगाबाद येथे लपवले होते. तसेच सनी आठवले यांनी सुद्धा यातील आरोपींना शरण देऊन अक्षय आठवले मार्फत संरक्षण पुरवले होते. या काका पोलिसांना गुन्ह्यात वापरलेला मनीष क्षीरसागर याचा मोबाईल मिळाला आहे. या माध्यमातून आणखी पुरावे या गँगच्या विरुद्ध पोलिसांना मिळणार आहे. या संपूर्ण प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंबर गोलडचे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहायक पोलिस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, सुषेंन पवार, सचिन अलगट,

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८६१
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २७/१२/२०२४

**अर्जदार श्री./ :- शेख समीयुद्दीन शेख शमशुद्दीन**
**प्रकरण :- सर्व्हे नं.४५४/१ सहान प्लॉट नं. ४२, सहान प्लॉट नं. ४३, सहान प्लॉट नं.४४, सहान प्लॉट नं. ४५, व सहान प्लॉट नं.४६ चे हस्तांतरण करणे बाबत.**

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ----- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चर्तु:सिमा**
पुर्व :- प्लॉट नंबर ३६ ते ३९ व ४१
पश्चिम :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- --------------------१२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- सर्व्हे नं.४५४ मधील भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/८८५
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- ०९/०१/२०२५

अर्जदार श्री./ :- शकिला हुजूर पठाण
प्रकरण :- सर्व्हे नं.११ प्लॉट नं.८ सिटी सर्व्हे नं.१८७१/अ/८ पुर्वे कडील भाग न.प.मि.नं.१८-१२९-८/१ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ----- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- सर्व्हे नं.११ मधील सहान जागा
पश्चिम :- याच प्लॉट नं.८ मधील निस्प भाग
दक्षिण :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- सर्व्हे नं.११ मधील जमीन

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८६२
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २७/१२/२०२४

अर्जदार श्री./ :- युवराज धनु कलाल
प्रकरण :- सर्व्हे नं.४५४/१ प्लॉट नं.१० सिटी सर्व्हे नं.२९६६/१० न.प.मि.नं.१८-१६७-१० तसेच , प्लॉट नं.११ सिटी सर्व्हे नं.२९६६/११ न.प.मि.नं.१८-१६७-११ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १०-११ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नंबर १५ व १६
दक्षिण :- प्लॉट नंबर ९
उत्तर :- प्लॉट नंबर १२ व १३

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८५८
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २७/१२/२०२४

अर्जदार श्री./ :- अब्दुल अजीम वजीरोद्दीन शेख
प्रकरण :- सर्व्हे नं.४५४/१ सहान प्लॉट नं. ८ सिटी सर्व्हे नं. २९६६/८ न.प.मि.नं.१८-१६७-८ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ८ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नंबर १८
दक्षिण :- सर्व्हे नंबर ४५४ मधील भाग
उत्तर :- प्लॉट नंबर ९

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---



# वैद्यराज विद्यालयात भारत टॅलेंट सर्च परीक्षा उत्साहात संपन्न

अंबड (प्रतिनिधी)

एज्युमीट केडमी आयोजित २१ व्या शतकातील जीवन कौशल्या वर व एन ई पी २०२० वर आधारीत भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२५ चे आयोजन अंबड तालुक्यातील वैद्यराज माध्यमिक विद्यालय अंबड येथे उत्साहात आयोजन करण्यात आले. या परीक्षेसाठी जि. प. प्रा. शा. ढालसखेडा, मसई, दूधपुरी, हस्तपोखरी, झिरपी , दाढेगाव, भालगाव , माळीवाडी, बारसवाडा, वडीकाळ्या , पारनेर तांडा तसेच अंबड तालुक्यातील इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत मोठया उत्साहाने सहभाग घेतला. वैद्यराज विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्रीकांत जायभाये सर यांनी परीक्षा केंद्रासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. अंबड येथील राजमुद्रा अभ्यासिकेचे संचालक गणेश मुळे सर यांनी बीटीएस परीक्षा पारदर्शक होण्यासाठी पर्यवेक्षन यंत्रणेसाठी मोलाची भूमिका बजावली. अंबड येथील परीक्षा यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी केंद्रसंचालक नितीन रोहोकले, गणेश जाधव, दिलिप तौर ,दत्तात्रय धुमाळ ,गजानन पुरी , सुभाष हर्षे, दत्तात्रय शिंदे, विकासकुमार ढोले, शिवाजी धुपे, सचिन दोरखे , श्रीनिवास ढाकणे ,बहीर सर ,प्रशांत कानडे, संदीप साबळे, संदीप महाडिक सर , सय्यद मॅडम , आदींनी परीक्षा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

---



# 'सावरकर ' मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त

## ग्रंथालयात साकारला साहित्याचा वटवृक्ष

बीड (प्रतिनिधी )

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयांत 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवड्याच्या निमित्ताने ग्रंथालयाने मराठी साहित्याच्या विविध प्रकारच्या ग्रंथांचे प्रदर्शन आणि साहित्य प्रकार दर्शवणारा वटवृक्ष वाचकांसाठी उभारला. या प्रदर्शनाचे उद्घाटक डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाप्रती गोडी निर्माण करण्याच्या ग्रंथालयाच्या अभिनव प्रयत्नांचे कौतुक केले. या सर्व उपक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांचे प्रोत्साहन ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांचे मार्गदर्शन व सचिन चौरे आणि बाळासाहेब वाघमारे यांच्या कल्पकतेतून उपक्रम साकारला.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८६०
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २७/१२/२०२४

अर्जदार श्री./ :- सलमान खॉन फेरोज खॉन
प्रकरण :- सर्व्हे नं.४५४/१ सहान प्लॉट नं. २७ सिटी सर्व्हे नं. २९६६/२७ न.प.मि.नं.१८-१६७-२७ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( २७ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नं.२१
पश्चिम :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट नंबर २८
उत्तर :- प्लॉट नंबर २६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८५९
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २७/१२/२०२४

अर्जदार श्री./ :- शेख समीर अहेमद शेख इफ्तेखार
प्रकरण :- सर्व्हे नं.४५४/१ सहान प्लॉट नं. ९ सिटी सर्व्हे नं. २९६६/९ न.प.मि.नं.१८-१६७-९ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ९ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नंबर १७
दक्षिण :- प्लॉट नंबर ८
उत्तर :- प्लॉट नंबर १०

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

---

**दै.समर्थ राजयोग** दि.२२/०१/२०२५

**CHANGE IN NAME**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME :- SUDAM BABURAO MULE**
**NEW NAME :- SUDAM BABURAV MULE**
ADDRESS :-AT. POST CHINCHOLI ,
TQ. GHANSANGVI, DIST. JALANA -431209
Mobile No. 8975750777

---

## पत्रकार संघ वडवणी डिजिटल मीडिया अध्यक्षपदी सतीश मुजमुले कोषाध्यक्षपदी युवा पत्रकार अंकुश गवळी यांची निवड



बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे .यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या आदेशानुसार प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी वडवणी तालुका कार्यकारणी जाहीर केली ,ज्येष्ठ मार्गदर्शक विनायक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यकारणी निश्चित करून जाहीर करण्यात आली,

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणी तालुका अध्यक्षपदी अशोक निपटे ,उपाध्यक्षपदी शांतिनाथ जैन, सचिव पदी अर्जुन मुंडे, कोषाध्यक्षपदी शंकर झाडे, तर वडवणी तालुका डिजिटल मीडिया संघ तालुका अध्यक्षपदी सतीश मुजमुले, उपाध्यक्षपदी शेख एजाज, सचिव पदी अशोक फपाळ, कोषाध्यक्षपदी अंकुश गवळी, तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी प्राध्यापक श्रीनिवास काकडे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर लंगे. सचिव पदी गंगा भीष्म अंडील सर, कोषाध्यक्षपदी शंकर जाधव, इत्यादींचे निवडी जाहीर करण्यात आले आहेत, सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा पदाधिकारी यांचा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन सत्कार केला.

---




# साई मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन

बदनापूर (प्रतिनिधी)

साई मॉडर्न इंग्लिश स्कूल सोमठाणा फाटा बदनापुर च्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मंगलवारी (दि.२१ जानेवारी) बदनापूर तालुक्याचे माननीय आमदार श्री नारायण कुचे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी आमच्या सर्वांचे प्रेरणास्थान श्री बळीरामजी गीते यांनी संस्थेबद्दल व त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाचे महत्व याबद्दल मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सौ. करुणा जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकांत शाळेच्या क्रीडा विभागाचा आढावा घेतल्यानंतर शाळेतील विद्यार्थी तालुका व जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्तम यश प्राप्त करीत असून वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धेत शाळेचे नाव उज्वल केलेले आहेत. तसेच, शालेय उपक्रमांत विज्ञान प्रदर्शन शैक्षणिक अभ्यासक्रम यासह समाज उपयुक्त उपक्रमांत शाळेतील विद्यार्थी नेहमीच अग्रेसर असतात.त्यासाठी शाळेच्या अध्यक्षा सौ सुनीता बळीराम गिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले,असे त्यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रिडा अधिकारी श्री.संजय गाढवे सर हे होते.तर व्यासपीठावर श्री जगदाळे सर (तालुका क्रीडा संयोजक) , श्री.भगवान बारगाजे,श्री.संजय शिंदे श्री.ज्ञानदेव गव्हाणे,श्री.महादू गिते, श्री. देविदास पवार,आदी मान्यवर तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# महाराष्ट्र शासनांने नेमलेल्या न्यायालयीन चौकशी समितीत बीड जिल्ह्याच्या विविध अत्याचारीत

## नागरीकांना त्यांची समस्या मांडण्याची संधी द्यावी- माजी सैनिक

बीड(प्रतिनिधी)

मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी महाराष्ट्र शासनाने न्यायालयीन चौकशी समिती नेमल्याचे जाहीर केले आहे. हा निर्णय कौतुकस्पद आहे. परंतू बीड जिल्ह्याला बिहार राज्याच्या कारभाराशी जोडले जात असल्यामुळे संतोष देशमुख प्रकरणा व्यतिरिक्त पुर्वीच्या व नव्या अनेक गंभीर घटना या जिल्ह्यात आहेत. ज्यांचा संबंध तस्करी, गुंडगिरी, खंडणी, पोलीस अत्याचार व येथील प्रशासन राजकारणी, लोकप्रतिनिधी यांच्या अवैध प्रकारावर आक्षेप आहेत याचा आवाज उठवणाऱ्या नागरीकांवर अमानुष अत्याचार तसेच सतत गंभीर स्वरुपात अपराध वाढ होत आहेत. याचा बंदोबस्त करण्याची नामी संधी न्यायालयीन चौकशी समिती प्रमुख न्यायमुर्ती एम. टहलियान यांच्या समोर मांडणीची मुभा महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्र्यांनी द्यावी, अशी विनंती आहे. अशी सहमती शासनाने दिल्यास अनेक होणारे अनर्थ, अत्याचार टळतील व बीडच्या गुन्हेगारी वृत्तीला आळा बसेल, होणाऱ्या घटना टळतील.



या न्यायालयीन चौकशी समितीच्या कार्यकाळाला संलग्न मदतगार महिला आयोग, मानवी हक्क आयोग, अनुसूचित जाती आयोग, लोक आयुक्त, लोकपाल असा अनेक कायदेतज्ञ जनहित संस्थांना एक आठवड्याच्या मुदतीत कार्य करण्याचे आदेश सुनिश्चित करावेत, लोकांच्या तक्रारी या कार्यकारी संस्थाकडे बीड जिल्ह्यात मांडू द्याव्यात. तसेच सामान्य प्रशासन प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य यांचा दौरा ही निश्चित करण्यात यावा. यापूर्वी एक दोन जिल्हाधिकारी यांनी या जिल्ह्यात कार्यदक्ष काम केल्याचे दिसून येते. बहुतांश जिल्हाधिकारी यांनी बीडची अधोगती केल्याची दिसून येते. आजमित्तीला बीडचे कर्मचारी अधिकारी, ऑफीसमध्ये वेळेवर येत नाहीत. पाच दिवसाचा आठवडा केला असतानी व ९ वाजता कार्यालयात हजर राहाण्याचे आदेश असतानी ११ च्या नंतर ऑफीसला येत आहेत. दुपारी २ ते ४ भोजन मिटींग बैठका दोन ते तीन घंटे किंवा दिवसभर घेतात, प्रशसानाचा धाक नाही. सध्या तर सर्व अधिकारी, कर्मचारी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडीयम वर खेळ खेळत आहेत. मुख्यमंत्री महोदयांना विनंती की, न्यायालयीन चौकशी समितीशी विचार विनीमय संवाद बीड जनतेला मांडण्याची संधी द्यावी. मला या समिती समोर माझे म्हणणे मांडावयाचे आहे, असे प्रतिपादन माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी केले आहे.

# अब्दुल गणीभाई बागवान यांना राज्यस्तरीय श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीचे सचिव तथा ज्येष्ठ समाजसेवक अब्दुल गणीभाई बागवान यांना परळी वैजनाथ येथील दि.वा. सेवा संस्थेने राज्यस्तरीय श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर केला आहे.गणीभाई यांची समाजसेवेतील उत्कृष्ट कामगिरी लक्षात घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून उत्कृष्ट समाजसेवा करणाऱ्या व्यक्तींना दर तीन वर्षाला हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराचे वितरण २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय सर्व धर्मीय सामूहिक मोफत विवाह सोहळ्यामध्ये होणार आहे.या सोहळ्याला राज्यभरातून मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कोरोना काळात व इतर कोणत्याही क्षणी गणीभाई समाजसेवेसाठी तत्पर असतात.विशेष म्हणजे अन्नदानातून त्यांनी एक आगळे वेगळे विश्व तयार केले आहे. अन्नदान करण्याची त्यांची भूमिका या पुरस्कारासाठी मोलाची ठरली. संस्थेचे संस्थापक दीपक वांजरखेडे यांनी गणीभाई यांना श्री वैजनाथ रत्न हा पुरस्कार जाहीर करण्यापूर्वी तब्बल दोन महिने गणीभाई यांच्या कार्याचे विशेष सर्वेक्षण करून हा पुरस्कार जाहीर केला असल्याचे छोटेखानी कार्यक्रमात सांगितले. परळी वैजनाथ येथील दि.वा. सेवा संस्थान गेल्या ५० वर्षापासून समाज उपयोगी असंख्य उपक्रम राबवत आहे.दर तीन वर्षाला सामाजिक कार्यकर्ते व इतर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना श्री वैजनाथ रत्न पुरस्कार देऊन नावाजले जाते. यंदा २०२५ चा श्री वैजनाथ रत्न पुरस्कार आदर्श, किर्तीवंत, नामवंत, यशवंत, प्रतिभावंत, गुणवंत, चारित्र्यसंपन्न असलेल्या अब्दुल गणीभाई बागवान यांना जाहीर झाला आहे. येत्या २३ फेब्रुवारी रोजी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यात या पुरस्काराचे मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण होणार आहे.हे पुरस्कार जाहीर केल्याचे पत्र देण्यासाठी दि.वा. संस्थेचे संस्थापक दीपक वांजरखेडे व त्यांचे विश्वस्त भारत माने परळीहून बीडला आले होते. यावेळी डॉक्टर हनुमंत पारखे, पत्रकार भागवत तावरे, संपादक शेख रिजवान, शेहराज बागवान, एतेशाम बागवान, नुमान बागवान यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते गणीभाई यांना प्रदान केले. गणीभाई यांनी केलेल्या उत्कृष्ट समाज सेवेची ही पावती असून त्यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे काही दिवसापूर्वीच गणीभाई यांची महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीवर निवड झाली आहे.त्यानंतर हा पुरस्कार जाहीर झाला. एकंदरीत गणीभाई यांच्या निस्वार्थ सेवेचे हे फळच म्हणावे लागेल.

सत्कारमूर्ती करणार कन्यादान

अब्दुल गणीभाई बागवान यांना श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर करण्यापूर्वी दि.वा. संस्थेचे संस्थापक दीपक वांजरखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना हा पुरस्कार समाजसेवक यांना का देण्यात येत आहे याचे स्पष्टीकरण दिले. विशेष म्हणजे गणीभाई व आमची यापूर्वी कधीच ओळख नाही प्रसार माध्यमातून अनेक वेळा गणीभाई यांची मुलाखत वाचली. गणीभाई हे निस्वार्थी अन्नदान सेवेसाठी सहभाग घेतात.तसेच संस्थेचे विश्वस्त भारत माने यांनी तब्बल दोन महिने गणीभाई यांच्या कार्यशैलीवर नजर ठेवून होते.गणीभाई हे त्या परीक्षणात पात्र ठरले म्हणून या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे आणि सत्कारमूर्तीच या विवाह सोहळ्यात कन्यादान करणार आहेत. त्यामुळे सत्कारमूर्तींनी सहपरिवार या कार्यक्रमाला उपस्थित राहावे



अशी विनंती दीपक वांजरखेडे यांनी केली आहे.

२३ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्यस्तरीय सामूहिक विवाह सोहळा

परळी वैजनाथ येथे २३ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय सर्व धर्मीय सामूहिक मोफत विवाह सोहळा होणार आहे.

## निस्वार्थ सेवा कधीच वाया जात नाही

कोरोना काळामध्ये कोणी कोणाच्या जवळी जात नव्हते. त्या काळात गणीभाई यांनी अनेकांना दिलासा दिला. त्यांची सेवा केली. जिल्हा रुग्णालयातील मेस मधून हजारो रुग्णांना उत्कृष्ट दर्जाचे जेवण देऊन त्यांनी अशा काळात आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली. तसेच रात्री अपरात्री जिल्हा रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्ण आल्यानंतर अर्ध्या रात्री मेस मधून त्या रुग्णांना जेवण देण्याची तयारी ठेवली. तसेच अनेक वेळा रुग्ण घरून नाश्ता करून येत नाहीत आणि इंजेक्शन घेतात. इंजेक्शन घेतल्यानंतर अशा रुग्णांना चक्कर येते, मळमळ होते अशा रुग्णांनाही गणीभाईंचा आधार मिळतो. एकंदरीत निस्वार्थ केलेली सेवा कधीच वाया जात नाही. या राज्यस्तरीय श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर स्पष्ट होते.

## गरजूंनी विवाह सोहळ्यासाठी नोंदणी करावी

विविध सर्वधर्मीय समाजातील आर्थिक दुर्बल कुटुंब, निराधार कुटुंब, संकटग्रस्त कुटुंब, ऊसतोड व बांधकाम कामगार कुटुंब, अल्पभूधारक शेतकरी कुटुंब व आंतरजातीय विवाह नोंदणी करून या मोफत विवाह सोहळ्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन दि.वा. संस्थांचे संस्थापक दीपक वांजरखेडे यांनी केले आहे. येत्या २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी या लग्न सोहळ्याची नियोजन करण्यात आले आहे. या लग्नसोळ्यातच वैद्यनाथ रत्न पुरस्काराचे वितरणही होणार असून या कार्यक्रमाला मान्यवराने उपस्थित राहून वधू वराना शुभेच्छा पर आशीर्वाद देण्यात यावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बारसवाडा शाळेचे डोणगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश



अंबड (प्रतिनिधी)

तालुक्यातील डोणगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा धर्मवीर संभाजी हायस्कूल डोमेगाव येथे उत्साहात संपन्न झाल्या, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डोमेगावचे सरपंच अशोक काळबांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून मुजीब पटेल,बाळू मेंडके,किशोर साळे,केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर,मुख्याध्यापक बंडू बांगर,कैलास जाधव,सुभाष वाघमारे, अरूण काळे यांची उपस्थिती होती. प्रतिमापूजनानंतर क्रीडा स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डोणगावचे केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांनी क्रीडा स्पर्धेचे आयोजन उद्देश स्पष्ट केला केला.डोणगाव केंद्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला.अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना अशोक काळबांडे यांनी जिद्द,चिकाटी व परीश्रमाने यश मिळवता येते असे मत व्यक्त करून खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते पाचवी,इयत्ता सहावी ते आठवी या गटातील मुले आणि मुली यांचे खो-खो,कबड्डी,धावणे आदी सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकार घेण्यात आले.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. या स्पर्धेत बारसवाडा शाळेने घवघवीत यश संपादन केले.इयत्ता सहावी ते आठवी गटात मुले व मुलीच्या संघाने खो खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. ज्ञानेश्वर विठ्ठल राठोड या विद्यार्थ्यांला उत्कृष्ट खो खो खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या गटात मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बारसवाडा शाळेच्या दोन्ही गटाने प्रथम क्रमांक पटकावला.संस्कार भगवान मिठे धावण्याच्या स्पर्धेत प्रथम आला. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक कैलास जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार गोकुळ बोबलट,संतोष सावंत,श्रीधर कुलकर्णी, सुरेखा जाधव यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,बारसवाडा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत, तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष मिठे,गजानन मिठे,विठ्ठल सापते, जगदीश पवार, बाळकृष्ण मिठे,राम चव्हाण,राम मुळक यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीधर कुलकर्णी,दादाभाऊ गायकवाड,बापू मोरे,राम जाधव,अरूण काळे,गोकुळ बोबलट,पाखरे,दिपक सोळुंके,विठ्ठल तारख, गणेश काळे आदी केंद्रांतर्गत शिक्षकांनी सहकार्य केले.

# आ.सुरेश धस यांचा आदेश, अन प्रशासन गावच्या पारावर...

## शेतकऱ्यांकडून समाधान आणि आभार व्यक्त..



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी,पाटोदा, शिरूर मतदार संघातील शेतकरी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिरे आयोजित करण्याच्या प्रशासनाला दमदार आमदार मा.सुरेश धस यांनी आदेश देताच आष्टी तालुक्यातील तहसीलदार,तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना दिलेल्या सुचनेनुसार पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेतील अपात्रते संबंधी असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून गावोगावी नेमून दिलेल्या तारखांना गावच्या पारावर शिबीरे घेतली जात आहेत.

विधानसभा निवडणुकीमध्ये भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आलेल्या आणि सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या आ.सुरेश धस यांनी मतदारसंघातील विकास कामासह प्रशासनातील सर्वसामान्याला येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गावोगावी पारावर जाऊन सोडवाव्यात असे आदेश दिल्याने गावातील पारावर प्रशासनातील तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे व गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी विशेष मदत शिबिरे घेऊन पी.एम.किसान लाभार्थ्यांची ई-केवायसी नसणे,लँड सिंडींग नसणे, लाभार्थी अनट्रेसेबल असणे व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून अपात्रते संबंधित असणाऱ्या अडचणी सोडवल्या आहेत.आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात प्रशासनामार्फत विशेष मदत शिबिरे दि.२० ते २४ जानेवारीपर्यंत राबवले जाणार असून या कालावधीत प्रशासन शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेत अपात्र व या संदर्भात असणाऱ्या अडचणीचे निरसन करण्याचे काम करत आहे. या मदत शिबिरात शेतकऱ्यांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद असून या अभिनव उपक्रमाचे शेतकऱ्यांकडून आमदार सुरेश धस यांनी गावोगावी आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये समस्या सुटल्या बद्दल शेतकरी नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.आभार मानले जात आहेत. दिलेल्या कालावधीमध्ये नमो किसान योजनेअंतर्गत वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी या या ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिराचा लाभ घेण्याचे व आपल्या समस्या सोडण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

चिखली येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे, शिवाजी आवारे, शांतीलाल घोलप,अंकुश आवारे, अंगत शिंदे यांच्यासह उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,प्रमुख पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी,कर्मचारी, ग्रामस्थ या विशेष मदत शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित होत.



घनसावंगी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी परवानगी द्या.उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन घनसावंगी प्रतिनिधी/महाराष्ट्र राज्यांचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आले असता घनसावंगी तालुक्यातील व शहरातील विविध संघटना व शिवप्रेमी ची बर्याच वर्षांपासून प्रलंबित असलेला विषय छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यास प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी निवेदन दिले व त्यांना घनसावंगी हे तालुक्याचे ठिकाण असुन अद्यापही छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नसल्याचे निदर्शनास आणून दिले व चर्चा केली तसेच त्यांनी निवेदन वाचुन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.त्यावेळी नगरसेवक यादव देशमुख,रविंद्र तात्या तौर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र श्री मास्टर्स शरीर सौष्ठव स्पर्धे साठी लाईफ स्टाईल जीम चे खेळाडू हारुण सिद्दिकी ची निवड

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र बॉडी बिल्डींग असो. मुंबई व इंडियन बॉडी बिल्डर्स फेडरेशन मान्यतेने व न्यु कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डींग असोसिएशन आणि आदित्य भोसले युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२५ व मास्टर्स आणि दिव्यांग राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा

दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी राजाराम पूरी लेन न.५ बस रूट कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या अनुषंगाने बीड जिल्ह्याचे शरिर सौष्ठव संघ निवड चाचणी स्पर्धा दिनांक १९ .१. २०२५ रविवारी सायंकाळी ठिक ६ : ३० वाजता मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन लाईफ हेल्थ कल्ब, लाईफ स्टाईल जिम, महात्मा फुले शॉपींग सेंटर, नवी भाजी मंडई, बीड येथे दैनिक पा रशवभूमी चे संपादक मा.श्री गंमत भंडारी यांच्या अध्यक्षते खाली निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली सदरील स्पर्धेतून मास्टर्स बॉडीबिल्डिंग ५५ ते ६० वर्ष वयो




गटात सय्यद हारून शब्बीर हुसेन सिद्दीकी तर प्रशिक्षक सय्यद अमानउल्लाह यांची निवड एम बी बी ए, आय बी बी एफ च्या नियमानुसार करण्यात आली आहे. हि स्पर्धा मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन चे सचिव डॉ. सय्यद अरशियानउल्लाह मिसबाहउल्लाह यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या स्पर्धेसाठी दैनिक पार्श्वभूमीचे प्रतिनिधी पांडुरंग सुगाळे ,जिल्हयाचे शरीर सौष्ठव खेळाडू, जिम चालक मालक

# परळी नगरपरिषदची क्रीडा क्षेत्रात झेप विभागात द्वितीय !

परळी (प्रतिनिधी)

राज्य प्रशासनाच्या वतीने प्रत्येक वर्षी प्रशासकीय कर्मचारी यांना एक प्रोत्साहन म्हणून कर्मचारी खेळाडूंना शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात याचाच भाग म्हणून बीड जिल्हा प्रशासन मार्फत बीड येथील जिल्हा क्रीडांगण जिल्हाधिकारी येथे कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या या मध्ये परळी नगर परिषदने प्रथम क्रमांक पटकावला होता सर्व युवा कर्मचारी खेळाडुन सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले होते नंतर पुढील स्पर्धे करिता संभाजी नगर विभागीय स्तरावर सुद्धा दुसरा क्रमांक पटकावला असून विभागात द्वितीय बक्षीस देण्यात आले आहे या युवा कर्मचारी खेळाडूंनी परळी नगर परिषदला विभागात द्वितीय बक्षीस मिळवून दिल्या बद्दल नगर परिषदचे मुख्याधिकारी कांबळे साहेब यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे सर्व खेळाडूंना पुढे भविष्यात ही असेच प्रोत्साहन देत रहाणार असे म्हंटले आहे तर या कबड्डी स्पर्धेत युवा कर्मचारी खेळाडू म्हणून समाधान समुद्रे ,शरणम ताटे,दशरथ जगतकर ,विजय कांबळे प्रकाश क्षीरसागर ,राहुल वैध्य कीर्तिमहान जोगदंड ,निखिल वाघमारे ,संघानंद कांबळे ,सतीश गोखले आदी होते तर यांना मार्गदर्शन नगर परिषदचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे साहेब यांनी केले आहे.



# हाजारोंच्या उपस्थितीमध्ये संत वामनभाऊ महाराज यांचा आज पुण्यतिथी सोहळा साजरा होणार

मानूर ।प्रतिनिधी

प्रातःस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर लाखोंच्या उपस्थितीमध्ये आज बुधवार दिनांक २२ जानेवारी रोजी बरोबर ११:४५ वाजता पुष्पवृष्टी होऊन श्री संत वामनभाऊ महाराज यांची पुण्यतिथी भव्य दिव्य स्वरूपात साजरी होणार असून यासाठी महाराष्ट्रातील तमाम भाविक भक्तांनी उपस्थित असावे असे आवाहन श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज व विश्वस्तांनी केली आहे

दिनांक २१ मंगळवार रोजी रात्री नऊ ते अकरा वाजता श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह भ प विठ्ठल महाराज यांचे कीर्तन झाले आज दिनांक २२ बुधवार रोजी पहाटे नाथपरंपरेसह श्री संत वामनभाऊ महाराज, गुरु गोरक्ष महाराज, पुंडलिक महाराज यांच्या समाधीचे पूजन होईल त्यानंतर सकाळी दहा ते अकरा तीस पर्यंत संत वामन भाऊ यांच्या जीवनावर कीर्तन होईल बरोबर अकरा वाजून ४५ मिनिटांनी पुण्यपर्वकालीन पुष्पवृष्टी होईल त्यानंतर महंत गुरुवर्य यांचे आशीर्वाद पर मार्गदर्शन होईल त्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचा यथोपचार सन्मान होईल दुपारी ठीक एक वाजता आलेल्या सर्व लाखोंच्या संख्येने भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप होणार आहे या महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होईल तेव्हा यासाठी हजारोंच्या संख्येने श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर उपस्थित असावे असे आवाहन श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या विश्वस्तांनी केले आहे

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# मानूर येथे शिष्यवृत्ती केंद्र स्तरीय सराव परीक्षा संपन्न

## छबुआई लिंबाशेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर यांच्या वतीने संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

मानूर केंद्र समूहातील इयत्ता ५ वी व ८ वीच्या मुलांची शिष्यवृत्ती सराव परीक्षा अतिशय उत्साहात घेण्यात आली. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत दरवर्षी फेब्रुवारी महिन्यामध्ये पाचवी व आठवी या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते यावर्षीची शिष्यवृत्तीची मुख्य परीक्षा ९ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न होणार आहे. या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या इयत्ता ५ वी व ८ विच्या वर्गातील मुलांना मुख्य परीक्षेचा एक पूर्व अनुभव घेता यावा म्हणून मानूर केंद्रस्तरीय विशेष शिष्यवृत्ती सराव चाचणीचे आयोजन छबुआई लिंबा शेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर यांच्या वतीने २० जानेवारी रोजी रेणुका विद्यालय मानूर येथे करण्यात आले होते. या परीक्षेसाठी रेणुका विद्यालय मानूर ,घाटशिळा विद्यालय पारगाव, जि.प. प्रा. शाळा दहिफळेवस्ती, जि.प.प्राथ.शा.घा.पारगाव, जि. प.प्राथ. शाळा बडेवाडी, जि. प. प्राथ. शाळा घोडकेवस्ती या शाळेतील ९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मुख्य परीक्षेसारखेच वातावरण आयोजकांनी मानूर केंद्रस्तरावर निर्माण करत भाषा गणित पेपर १ व इंग्रजी बुद्धिमत्ता पेपर २ असे दोन्ही सराव पेपर घेतले. अत्यंत पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा संपन्न झाली. परीक्षा सुरू असताना केंद्रप्रमुख का.भा. खेडकर सर कें. मुख्या. मिठू आव्हाड सर मानूर गावचे आदर्श सरपंच अशोक मामा पाखरे, मोहब्बत पठाण, यांनी भेट दिली. परीक्षा संपल्यानंतर लगेच निकाल घोषित करून विजेत्या १३ विद्यार्थ्यांना मेडल,प्रमाणपत्र व फिरोज पठाण सर लिखित अभिनव प्रकाशन पुणे यांचे सुगम गणित,बुद्धिमत्ता व स्पर्धा परीक्षेची पुस्तके विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. सहभागी झालेल्या सर्व शाळांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. बक्षीस वितरण सोहळा ३.०० ते ५.०० या वेळेत संपन्न करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. बाबुशेठ नागरगोजे प्रसिद्ध उद्योगपती अहिल्यानगर, दीपक शेठ नागरगोजे, का.भा. खेडकर सर केंद्रप्रमुख मानूर, मिठू आव्हाड सर,पी .जी. पाखरे सर मुख्याध्यापक रेणुका विद्यालय मानूर, अर्जुन बनसोडे सर, रमेश खेडकर सर घाटशिळा विद्यालय पारगाव, संतोष भाबड सर, शिवचरित्रकार कैलास तुपे सर, मा.विजय बडे पी.एस.आय.मुंबई, महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेतील सुप्रसिद्ध लेखक फिरोज पठाण सर, दिनेश पाखरे सर,अर्जुन काळे सर, शितल काळदाते मॅडम, अंकुश खेडकर सर घोडकेवस्ती, दिनेश बडे, एकनाथ लोमटे,अमोल सानप, गणेश बडे, सलीम पठाण, दीपक देठे, बाबादेव बेळगे सर,व रेणुका विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.आज छबुआई लिंबाशेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर च्या सर्व सदस्यांनी स्तुत्य उपक्रम हाती घेत मुलांना उत्तम संधी दिली मी त्यांचे विशेष कौतुक करतो.




येणाऱ्या काळात आपल्याकडून विद्यार्थी हितांसाठी असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील अशी आशा बाळगतो; असे मत मानूर केंद्र समूहाचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख का. भा. खेडकर सर यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.विद्यार्थी मित्रांनो आम्ही सर्वजण तुमच्यासोबत आहोत. बाल वयापासूनच अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे व जिद्दीने आपण अभ्यास केला तर कोणत्याही परीक्षेत यश मिळवणे सहज शक्य असते म्हणूनच तुम्ही जरी ग्रामीण भागातील असाल तरीही सतत एक ध्येय समोर ठेवून अभ्यास करत रहा.तुमच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !असे मत दिनेश पाखरे सर यांनी व्यक्त केले. अभिनव प्रकाशन पुणे यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तीन लाख प्लस मुलांपर्यंत आपली पुस्तके पोहचवणारे स्पर्धा परीक्षेतील महाराष्ट्राचे नामवंत लेखक फिरोज पठाण यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना आपल्या प्रेरणादायी व अमृततुल्य शब्दांनी मंत्रमुग्ध करत वाहवा मिळवली. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक सकारात्मक उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर मांडत विद्यार्थ्यांच्या विचार, संशोधन व जिज्ञासू वृत्तीला जागे करण्याचा प्रयत्न केला. जीवनात कोणत्याही बाबी इतरांना दिल्या तरी चालतील पण स्वतःचा वेळ दुसऱ्यांना दिला तर तो परत मिळवता येत नाही म्हणून स्वतःचा वेळ स्वतःचे ध्येय पूर्ण करण्यासाठीच द्या असे मत फिरोज पठाण सर यांनी व्यक्त केले.आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी लेकरांनो शिका कष्ट करा ज्ञान मिळवा व स्वतःचे जीवन समृद्ध बनवा. असे मत पी.एस.आय. विजय बडे साहेब यांनी व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या. छबुआई लिंबाशेठ दादा मातृत्व सामाजिक प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांचे आभार जि. व्ही. गायकवाड सर यांनी मानले.या नंतर विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले या परीक्षेमध्ये इयत्ता आठवी मधून प्रथम क्रमांक चैतन्य नवनाथ बडे रेणुका विद्यालय मानूर याने १७४ गुण, द्वितीय क्रमांक आराध्या विठ्ठल गीते जि. प. प्रा.शाळा दहिफळेवस्ती १६८ गुण, तृतीय क्रमांक साक्षी रामनाथ कदम १६० गुण जि. प. प्राथ.शाळा दहिफळे वस्ती,चतुर्थ क्रमांक साक्षी लिंबाजी शिरसाट १५४ गुण जि.प. प्राथ. शाळा दहिफळे वस्ती,पाचवा क्रमांक चैतन्य परमेश्वर खेडकर घाटशिळा माध्य. विद्यालय घाटशीळ पारगाव १४८ गुण व उत्तेजनार्थ क्रमांक रोहित देविदास ढवळे रेणुका विद्यालय मानूर, शिवम गोरक्ष तुपे जि.प. प्राथ. शाळा दहिफळेवस्ती यांनी मिळवला, इयत्ता पाचवी मधून प्रथम क्रमांक रूपाली अशोक सानप १८२ गुण जि.प.प्राथ. शाळा घाटशीळ पारगाव, द्वितीय क्रमांक हर्षवर्धन सुहास चौधरी १७६ गुण जि.प.प्रा. शा. दहिफळेवस्ती, तृतीय क्रमांक पृथ्वी अशोक साबळे १५८ गुण जि. प. प्रा. शा. दहिफळेवस्ती ,चतुर्थ क्रमांक समीक्षा नारायण बडे १५६ गुण जि. प. प्रा. शा. दहिफळेवस्ती पाचवा क्रमांक विवेक संदीप सानप जि. प. प्रा. शा. घाटशीळ पारगाव व उत्तेजनार्थ क्रमांक प्रतीक्षा प्रदीप शिरसाट रेणुका विद्यालय मानूर, वृषाली बाळू घोडके जि. प. प्रा. शा. घोडके वस्ती यांनी मिळवला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष पप्पू शेठ बडे,दिनेश पाखरे सर, फिरोज पठाण सर, पी.एस.आय. सतीश बडे साहेब,पी.एस. आय.विजय बडे,सोमनाथ पाखरे,बाबादेव बेळगे,अशोक दहिफळे,बाळू पवार,संदीप बडे,भारत साबळे यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेला हा उपक्रम रेणुका विद्यालय मानूरचे प्राचार्य पी.जी. पाखरे सर यांनी अतिशय व्यवस्थित नियोजनाने यशस्वी केला.

# अंबाजोगाईत कपड्याच्या दुकानाला आग; २५ लखांचे नुक्सान

## अग्निशामक दलाच्या बंबाने तीन तास पाणी मारून आग आटोक्यात आणली

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील छत्रपती शिवाजीमहाराज चौकात असलेल्या नगर परिषदेच्या व्यापारी संकुलातील कपड्याच्या दुकानाला सोमवारी रात्री अचानक आग लागली. या आगीत दुकानातील रेडिमेड कपडे व फर्निचर जळून खाक झाले. या दुर्घटनेत अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले. सलग तीन तास अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी पाणी मारून आग विझविल्याने पुढील अनर्थ टळला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गणेश प्रभाकर राऊत यांचे आविष्कार मेन्स वेअर हे रेडिमेड कपड्यांचे दुकान आहे. नेहमी प्रमाणे गणेश राऊत हे सोमवारी रात्री दुकान बंद करून घरी गेले. रात्री ११.३० वाजता त्यांच्या दुकानातून धुरांचे लोट निघू लागले. हे पाहून रात्रीची पेट्रोलिंग करणारे पोलिस व बाजूच्या चहाच्या टपरीवाल्याने त्यांना फोन वरून ही माहिती दिली. गणेश राऊत यांनी धावत येऊन अग्निशामक दलाला संपर्क केला. मात्र तो पर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. या आगीत दुकानातील रेडिमेड कपडे, फर्निचर जळून खाक झाले. ही आग इतकी मोठी होती की अग्नीशामक दलाच्या



कर्मचाऱ्यांना आग आटोक्यात आणण्यासाठी तीन तास पाणी मारण्याचे काम करावे.लागले. या आगीत राऊत यांच्या दुकानातील माल जळून अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेचा महसूल विभाग, व महावितरण यांच्या वतीने पंचनामा करण्यात आला आहे. मात्र ही आग नेमकी कोणत्या कारणाने लागली याचे रहस्य पोलीस तपासातूनच उलगडणार आहे.

अर्ध्या रात्रीही अनेकजण मदतीसाठी धावले

छत्रपती शिवाजीमहाराज चौकात मध्यरात्री ही दुर्घटना घडली. याची माहिती तात्काळ सर्वत्र प्रसारित झाली. घटनास्थळी अनेकांनी धाव घेत मदतीचा हात दिला. सामाजिक कार्यकर्ते निलेश जगदाळे, कल्याण काळे धनराज सोळंकी,शकील शेख,स्वपिल परदेशी,संतोष मोहिते,प्रवीण चोकडा, गोपाळ परदेशी,पतंगे असे सर्वजण मिळून मदतीसाठी धावून गेले. आग आटोक्यात आणण्यासाठी या सामाजिक कार्यकर्त्यांची पहाटे पर्यंत धावपळ सुरूच होती. घटनास्थळी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ वीज पुरवठा खंडित केला. यामुळे मोठी दुर्घटना टळली.


# चोरीच्या तब्बल ६३ मोबाईलसह कार जप्त !

## सुटीवर असलेल्या पोलिसाच्या कर्तव्यदक्षपणामुळे मोबाईल चोरांच्या आंतरराज्यीय टोळीचा छडा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

साप्ताहिक सुटी असल्याने बीडहून अंबाजोगाईला आलेले पोलीस कर्मचारी तेजस वाहुळे यांना बस स्थानकात एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याच्यावर पाळत ठेवली. त्यानंतर कारमध्ये निघालेल्या त्या चोरट्याचा पाठलाग करून वाहुळे यांनी त्यास पकडले असता त्याच्याजवळ चोरीचे तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. यावेळी त्या चोरट्याचे तिघे साथीदार मात्र पलायन करण्यात यशस्वी झाले. ही घटना मंगळवारी (दि.२१) दुपारी अंबाजोगाई शहरात घडली.

तेजस वाहुळे सध्या बीड पोलीस मुख्यालय कर्तव्य बजावत आहेत. अधिक माहिती अशी की, साप्ताहिक सुटी असल्याने वाहुळे अंबाजोगाईत आले होते. दुपारी मुलाची शाळा सुटेपर्यंत वाट पाहत ते बस स्थानकात थांबले होते. यावेळी एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने तो पाकीटमार किंवा मोबाईल चोर असून शकतो अशी खात्री झाल्याने वाहुळे यांनी त्याच्यावर पाळत ठेवली. थोड्यावेळात तो तरुण लगबगीने बस स्थानकच्या बाहेर पडला आणि रस्त्यावर थांबलेल्या एका कारमध्ये



बसलेल्या तीन साथीदारांसह लगबगीने निघाला. वाहुळे यांनी तत्काळ एका ऑटोरिक्षातून त्या कारचा पाठलग सुरु केला. आपल्या पाळतीवर कोणी येत असल्याची अजिबात कल्पना नसलेल्या त्या चोरट्यांनी कार भगवानबाबा चौकातील पंपावर सीएनजी भरण्यासाठी थांबवली. यावेळी तिघेजण काह्नी उतरले तर एकजण कार जवळच थांबला. पाठलाग करत आलेल्या वाहुळे यांनी कारजवळ थांबलेल्या चोरट्यास पकडले आणि चौकशी सुरु केली. यावेळी त्याच्यासोबतचे तिघे पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलीसी खाक्या दाखवताच त्या चोरट्याने तो स्वतः नागपूरचा असून सोबतचे तिघे साथीदार झारखंडचे असल्याचे सांगून आत्ता बस स्थानकातून एक मोबाईल चोरला असल्याचे कबूल केले. त्यानंतर वाहुळे यांनी कारची झडती घेतली असता आतमध्ये तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. वाहुळे यांनी मोबाईल आणि कारसह त्या चोरट्याला शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. या कामगिरीबद्दल तेजस वाहुळे यांचे कौतुक होत आहे.

### सहा आयफोनचा समावेश

दरम्यान, जप्त केलेल्या ६३ मोबाईलमध्ये सहा आयफोनचा समावेश आहे. हे मोबाईल ट्रेस होऊ नयेत म्हणून चोरट्यांनी त्याला चांदीच्या आवरणात गुंडाळले होते. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाच्या वतीने स्कुल कनेक्ट भाग २.० अंतर्गत केजतालुक्यातील शाळांमध्ये जनजागृती

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्रराज्य उच्चशिक्षण विभागाच्या वतीने दि.१ ते १५ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० अंतर्गत स्कुल कनेक्ट २.० संपर्क अभियाना अंतर्गत केजतालुक्यातील विविध माध्यमिक विद्यालयात जन जागृती कार्यक्रम घेण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने विद्यार्थी,शिक्षक,पालक या मध्ये जागृती व्हावी म्हणून महाराष्ट्रशासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या वतीने स्कूल कनेक्टभाग ०.२ संपर्क अभियान राबविण्यात येत आहे. बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज च्या वतीने वसंत विद्यालय, जय भवानी कन्याप्रशाला केज,शंकर विद्यालय साळेगाव,लाल बहादूर शास्त्री विद्यालय चंदन सावरगाव,माऊली विद्यालय जवळबन या ठिकाणी कार्यक्रमघेण्यात आले.या शाळेत जावुन बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्राध्यापकांनी नविन शैक्षणिक धोरणावर चर्चा करुन जन जागृती केली.

त्याच बरोबर महाविद्यालयातील ग्रंथालय व माहिती केंद्र यांच्यावतीने वाचनसंकल्प पंधरवडा शाळेतील




विद्यार्थ्यांना सहभागी करून यशस्वी करण्या साठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.हे अभियान बाबुरावजी आडसकर महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधवराव फावडे, ग्रंथालय प्रमुख डॉ.आशा बोबडे यांच्या मार्गदर्शना खाली राबविण्यात आले.या संपर्क अभियानास शिक्षक व विद्यार्थी,पालक यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला आहे.




# पोलिस व पत्रकारांना परस्पर सहकार्याची गरज

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार

देगलूर/प्रतिनिधी

पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने देगलूर येथे आयोजित पोलीस व पत्रकारांचा सन्मान आणि कार्यालय उद्घाटन सोहळ्यात जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलिस व पत्रकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भाष्य केले.ते म्हणाले पोलिस आणि पत्रकार हे समाजाचे आधारस्तंभ असून, सत्य आणि न्यायासाठी दोघांचेही समान उद्दिष्ट आहे. त्यामुळे परस्पर आदर आणि सहकार्य राखणे अत्यावश्यक आहे. फक्त हंगामा निर्माण करण्याऐवजी सकारात्मक बदल घडवणारी पत्रकारिता करणे महत्त्वाचे आहे. कार्यक्रमात पोलिस व पत्रकार यांचा सन्मान करण्यात आला. यात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यात सेवानिवृत्त वाहतूक पोलिस शेख अब्दुल अमीर यांना आदर्श पोलिस पुरस्कार, देगलूर शहर स्वच्छतेचा जागर ग्रुपला आदर्श पर्यावरण मित्र पुरस्कार, स्व. प्रशांत माळगे (मरणोत्तर) आणि ज्येष्ठ पत्रकार अविनाश देशपांडे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी कार्यालय उद्घाटन अबिनाश कुमार व संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी संकेत गोसावी उप वि. पो. अ., पो. नि. मारूती मुंडे, सहायक पोलिस निरीक्षक, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, लक्ष्मीकांत पदमवार, डॉ. पूजा सचिन गायकवाड संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड, जिल्हा सचिव शशिकांत गाडे पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष शेख असलम यांनी केले तर सूत्रसंचालन मिलिंद वाघमारे आणि आभार प्रदर्शन गजानन टेकाळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख असलम (तालुकाध्यक्ष), अमित पाटील (उपाध्यक्ष), मिलिंद वाघमारे (सचिव), धनाजी देशमुख (कार्याध्यक्ष), तौहिद काझी (कोषाध्यक्ष), गजानन टेकाळे (संघटक), मनोज बिरादार (सहसचिव), धनाजी जोशी (प्रसिद्धीप्रमुख), गजानन शिंदे (सहकोषाध्यक्ष) उबेद हबीब (सदस्य), किरण सोनकांबळे (सदस्य), सय्यद समी, सुजित सूर्यवंशी, अफान शेख, सचिव कुंभारे आदींनी परिश्रम घेतले.

# अंबड राज्यस्तरीय सुर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा पार पडली राज्यभरातून उत्तुंग प्रतिसाद

अंबड ।प्रतिनिधी

अंबड येथे आयोजित राज्यस्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा पार पडली. त्यामध्ये राज्यभरातून उत्तुंग प्रतिसाद लाभला. अनेक योगशिक्षक, योगप्रशिक्षक आरोग्य प्रेमी यांनी सहभाग नोंदवला.सुमारे १००० हून अधिक राज्यभरातून प्रतिस्पर्धी व योगशिक्षक सामील झाले होते.त्या पैकी अतिउत्तम कामगिरी करणारे ५० जणांची निवड या स्पर्धेमध्ये करण्यात आली. अर्थातच आपल्या बीड जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाणाऱ्या योग मार्गदर्शक,योग प्रशिक्षक श्रीमती राधा तांबे यांनी टॉप ५० मध्ये येण्याची सुमार कामगिरी केली. सुमारे सात तास सूर्यनमस्कार करत त्यांनी अतिशय उत्तम सादरीकरण करून योगा मधली त्यांची प्राविण्यता पुन्हा सिद्ध केली अर्थातच योग क्षेत्रात त्यांचे कौशल्य आपणा सर्वांना ज्ञात आहे. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे विद्यार्थी पश्चिम बंगाल येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुवर्णपदक तसेच रोप्यपदक मिळवत व्हिएतनाम होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास पात्र ठरले हा एक गुरुशिष्यांचा कपिलाषष्ठीचा योग यानिमित्ताने घडून आला. याचे कारण त्यांचे नियमित ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रशिक्षण वर्ग चालतात त्याचा परिणाम स्वरूप अनेक विद्यार्थी राज्य देश पातळीवर योगामध्ये आपली वेगळी प्रतिमा तयार करत आहेत. त्यांचे योग क्षेत्रातले कौशल्य आणि धडाडी योगाला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यास खूप जास्त सहाय्यभूत ठरत आहे. आपल्या माननीय पंतप्रधानांनी २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये विश्वाला योगाची ओळख करून दिली आणि भारत जगाचा विश्वगुरू बनेल त्यात योगा मोलाचा वाटा राबवेल अशी अपेक्षा व्यक्त केली होती त्याला अनुसरून आज श्रीमती राधा तांबे यांच्यासारख्या विख्यात मार्गदर्शक मोलाचा हातभार लावत आहेत. नुकत्याच अंबडला झालेल्या राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षक प्रशिक्षण व स्पर्धा मध्ये त्यांची विशेष



## पशुसंवर्धन,दुग्धविकासा च्या उज्वल भवितव्या साठी संशोधकांचे योगदान व नवतंत्रज्ञानाचा अधिक वापर महत्वाचा,नागपूर येथे

# जागतिक पशू आहार शास्त्र परिषदेचे पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात उद्घाटन

**नागपूर/प्रतिनिधी**

**ग्रामीण भागाला सावरणाऱ्या शेतीपुरक पशु-पक्षी पालन,मत्स्य व्यवसाय उद्योगाला भविष्यात जर अधिक शाश्वत करायचे असेल तर हवामान बदलाचा विचार करुन प्राण्यांच्या पोषक अन्नद्रव्याचे काटेकोर नियोजन करणे नितांत आवश्यक आहे.याच बरोबर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना अन्न सुरक्षिततेसह शेतीपुरक उद्योग व्यवसायातून चांगल्या उत्पन्नाची संसाधने अधिक भक्कम करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी केले.**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या.नागपूर पशुवैद्यकीय महा विद्यालयाच्या रजतजयंती सभागृहात आयोजित या समारंभास पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन,भारतीय कृषी अनुसंसाधन परिषदेचे महासंचालक डॉ.हिमांशु पाठक,पशु विज्ञान शाखेचे उप महा संचालक डॉ.राघवेंद्र भट्ट, कुलगुरु डॉ.नितीनपाटील, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ.प्रविणकुमार देवरे व ज्येष्ठ संशोधक उपस्थित होते.

पशुधन,वनसंवर्धन, पर्यावरण आणि शाश्वत जीवनशैलीबाबतभारतीय संस्कृतीने आपल्यालाएक अमूल्य देणगी दिली आहे आपल्या ईश्वरांनीही आपले वाहन पशुधनातून घेतले आहे.याच बरोबर पक्ष्यांनाही सन्मान दिला. पुर्वापार चालत आलेल्या परंपरा व ज्ञानाच्या आधारावर शेतीला पशु धनाची जोड देत यातून अतिरिक्त उत्पादकता आपल्या पुर्वजांनी घेऊन दाखविली.या क्षेत्रातील संशोधकांनी कालपरत्वे दिलेल्या योगदानाच्या साहाय्याने प्रगतीचा एक मोठा पल्ला आपण गाठू शकलो.आजच्या घडीला दुधाच्या




उत्पादनात आपण जगात प्रथम क्रमांकावर आहोत.अंडी उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावरआहोत.ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा देण्याचे सामर्थ्य पशु वैद्यकीय शास्त्रात असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरणातील संतुलन राखावे.

उपलब्ध असलेल्यासाधन संपत्तीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे दुध,मांस,अंडी उपलब्ध व्हावेत,यातील पोषण मुलद्रव्य वाढण्यासह पर्यावरणातील संतुलनही राखले जावे यादृष्टीने आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषद महत्वाची आहे.या निमित्ताने आपण सर्व संशोधक एकत्र येऊन या क्षेत्राला नवी दिशा द्याल याची खात्री असल्याचे ना.पंकजा मुंडे यांनी सांगितले.

मत्स्योत्पादन क्षेत्रातही आज अनेक संशोधने झाली आहेत.जनावरांच्या चाऱ्याच्या व्यवस्थापना पासून ते मत्स्य बीजोत्पादन,त्यांचे वजन, त्यांना अधिक पौष्टीक करणे यासह जल व्यवस्थापन असे अनेक क्षेत्र संशोधकांसाठी खुले आहेत.दुधाच्या गुणवत्ते पासून गरजेनुरुप उपलब्धतेपर्यंत अनेक क्षेत्रात संशोधक योगदान देत आहेत.या क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठीग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्यासह चांगल्या बदलासाठी आपण सर्व सिध्द होऊ यात,असे त्या म्हणाल्या.

आजवरच्या प्रशासकीय सेवेतील हा माझा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे.याच ज्ञानशाखेत माझे शिक्षण झाले असून इथे गुरुजनांच्या उपस्थितीत मला सहभागी होताआले, या शब्दात पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ.रामास्वामी एन. यांनी कृतज्ञता व्यक्तकेली. सर्व संशोधकांच्या योगदानातून एक उज्ज्वल मार्ग यापरिषदेतून मिळेल असे त्यांनी सांगितले. कुलगुरु डॉ.नितीन पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात यापरिषदेचे महत्व विषद केले. पर्यावरणाच्या संतुलना साठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. भविष्यात असणारी मागणी लक्षात घेता या क्षेत्रात मोठी संधी आहे. विद्यापीठातील संशोधन ग्रामीणभागातीलशेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठ कटिबध्द असल्याचे त्यांनीसांगितले या समारंभात ज्येष्ठ शास्त्रज्ञांचा गौरव करण्यात आला.

---

# बीड जिल्ह्यात ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस

## बोगस फळबाग पीक विमा प्रकरणी चौकशी सुरु पण खरंच कारवाई होईल का? ; जिल्हाप्रशासनाचे गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांना पत्र :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

राज्यातील मृग बहार २०२४ योजनेंतर्गत बोगस फळबाग पिक विमा प्रकरणात शासनाची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करणाऱ्या बीड जिल्ह्यातील संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केल्यानंतर त्या निवेदनाच्या अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसीलदार महसूल - १ अविनाश शिंगटे यांनी महाराष्ट्र शासन गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांना संदर्भीय निवेदनाची प्रत उचित कार्यवाहीस्तव पाठवली असुन खरंच संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत की नेहमीप्रमाणेच हा सुद्धा चौकशीचा फार्स ठरणार आहे अशी शंका डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२४ व पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२४ मधील विमा संरक्षित क्षेत्राची कृषी आयुक्तालयातील पथकांमार्फत क्षेत्रीय पडताळणी करण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले होते.त्या अनुषंगाने १६ ते १८ आक्टोबर २०२४ या कालावधीत बीडसह ईतर जिल्ह्यातील निवडक तालुक्यात विमा सहभागी शेतकऱ्यांच्या क्षेत्राची पडताळणी करण्यात आली होती.या तपासणी पथकामध्ये कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचा समावेश



होता.पथकांमार्फत बीड, जालना,अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना व सांगली या जिल्ह्यांमध्ये तपासणी करण्यात आली होती.सदरील मोहिमेत एकुण ३६१ फळबागांची तपासणी करण्यात आली होती.या तपासणी मध्ये फक्त १४८ ठिकाणीच योग्य फळबागा आढळून आल्या होत्या.

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृगबहार सण २०२४ मध्ये विमा भरलेल्या बीड जिल्ह्यातील ३४२३ अर्जदारांच्या क्षेत्रावर जाऊन तपासणी केली जात आहे. तपासणी दरम्यान आतापर्यंत ७२५ ठिकाणी फळबागा नसणे, अधिकचे क्षेत्र दाखवणे, झाडे लहान असणे अशी प्रकरणे समोर आली आहेत. ही सर्व बोगस प्रकरणे विमा कंपनीने रद्द करावी अशी सूचना जिल्हास्तरीय समितीने संबंधित विमा कंपन्यांना केली आहे. अद्याप ७०टक्के तपासणी झाली असून १०० तपासणी झालेली नाही. पुढील कालावधीत विमा काढलेल्या प्रत्येक ठिकाणी जाऊन तपासणी केली जाणार आहे सर्व तपासणी झाल्यानंतर हा अहवाल पुढे कृषी आयुक्तालयास पाठविण्यात येणार आहे .

आष्टी तालुक्यातील केरूळ, कडा, धामणगाव, बिरंगुळवाडी या गावातील ४० ठिकाणी प्रतिनिधिक स्वरूपात फळबाग पीक तपासणी केली असता १८ योग्य अर्ज आढळले होते. ३ ठिकाणी फळपीक बाग आढळली नाही. प्रत्यक्षात लागवड क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र विमा घेतलेल्या अर्जांची संख्या १६ तर तपासणी वेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या उत्पादनक्षम वयापेक्षा कमी वय आढळलेल्या अर्जांची संख्या

---

## आनंदगाव येथील जेष्ठ महीला श्रीमती चंपाबाई गायकवाड यांचे निधन

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ महिला चंपाबाई भगवान गायकवाड वय ८० वर्ष यांचे मंगळवार रोजी पहाटेच्या सुमारास दुःखद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर आनंदगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात तीन मुली,दोनमुले, सुना,जावाई,नातवंडेअसा मोठा परिवार आहे. कष्टाळू भाभी म्हणून त्या सर्व परिचित होत्या.त्या ह.भ.प.दादा महाराज गायकवाड व ह.भ.प. उत्तम महाराज गायकवाड यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरावर शोककळा पसरली आहे.






## वडखळ पोलीस ठाण्यात सुविधायुक्त कक्षा मुले वडखल पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांचे वडखल विभागातून कौतुक!

गडब / सुरेश म्हात्रे

मा. पोलीस अधीक्षक सो. रायगड यांच्या मार्गदर्शना नुसार.

सात कलमी योजने अंतर्गत वडखळ पोलीस ठाणे अंतर्गत , वडखळ पोलीस ठाणे समोरील कंपाउंड भिंत पूर्णपणे पांढऱ्या रंगाने रंगवून त्यावर संपूर्ण भिंतीवर सुरक्षा संदेश देणारे समान आकाराचे बॅनर लावून. समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याच बरोबर पोस्टे अंतर्गत असलेल्या आतील भागातील सर्व झाडे रंगवून घेऊन संपूर्ण पोलीस स्टेशनं परिसर स्वछ, सुशोभीत करण्यात आला आहे. तसेच सात कलमी योजने अंतर्गत वडखळ पोलीस ठाणेत

सर्व सुविधा युक्त स्वागत कक्ष कार्यान्वित केले आहे ज्या मध्ये

येणाऱ्या अभ्यंगतासाठी स्वागत गीत वेवस्था आहे.,अभंगसाठी बसण्याची चांगली वेवस्था केली आहे,अभ्यंगत्यांच्या स्वागतासाठी पर्यावरण संवरक्षणाची दक्षता घेतलेले बुके ठेवण्यात आले आहेत,चांगला टीपॉय असून त्यावर वर्तमान पत्राची वाचणासाठी वेवस्था केली आहे.,शुद्ध पिण्याच्या पाण्याची वेवस्था केली आहे.,रायगड पोलीसांची उत्तम कामगिरी दाखवणारे स्लाईड असलेली टीव्हीची वेवस्था केली आहे,त्यांना सर्व कायाद्याची माहिती देणारे बॅनर, मार्गीका दाखवणारे बोर्ड, लावण्यात आले आहेत,अभ्यंगतांनी पोलीस स्टेशनला भेट दिल्याची नोंद घेणेसाठी स्वतंत्र नोंद वही ठेवली आहे.,ठाणे अंमलदार यांना सौजन्यपूर्वक वर्तना बाबत अवगत केले आहे,ाि /रळि दर्जाचे देखरेख अधिकारी नेमून त्वरित सकारात्मक प्रतिसादाची वेवस्था केली आहे, ठाणेदार कक्ष सुशोभीत करून, त्या ठिकाणी एकाच प्रकारच्या खुर्च्या ठेवण्यात आले आहेत,संपूर्ण पोलीस ठाणेतील, लेखनिक कक्ष,गन्हे लेखनिक कक्ष, अधिकारी कक्ष, बिनतारी संदेश कक्ष, ललींपी कक्ष, गोपनीय कक्ष, बारणीशी कक्ष, एकाच प्रकारच्या खुर्च्या ठेवल्या आहेत., पो स्टे मध्ये सर्व प्रसाधान ग्रह स्वछ व वापरास अध्यावत केली आहेत,पो स्टे परिसराचे सौंदर्यकरण करण्यात आले आहे,उपरोक्त पूर्तते मुळे पोलीस ठाण्याचे वातावरण प्रसन्न व आल्हाददायक करण्यात आले आहे.

उपरोक्त सुरक्षा संदेश प्रसारणामुळे वडखळ हद्दीतील विध्यार्थी, नागरिक व पत्रकार सदरचे सुरक्षा संदेश वाचून आनंदी होत आहेत वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या ह्या समाज जागृती व्यवस्थेचे संपूर्ण वडखळ तसेच कासू विभागातून कौतुक होत आहे .

---

# बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ चे आयोजन आ. शेखर निकम यांची प्रमुख उपस्थिती

संगमेश्वर/ प्रतिनिधी : विलास गुरव येथील बुरंबाड कातळ स्टॉप मैदानावर बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ चे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेला कोकणचे लोकप्रिय आ. शेखर निकम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जय हनुमान बुरंबाड क्रिकेट क्लब मार्फत बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शनिवार दि. २५ व रविवार दि. २६ अशी दोन दिवस चालणार असून ती लीग स्वरूपाची स्पर्धा असणार आहे. हि स्पर्धा दोन्ही दिवस रात्रीच्या वेळेस खेळविण्यात येणार आहेत. सदर अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेमध्ये ६ संघांचा समावेश राहणार असून प्रत्येक संघाच्या ५ मॅचेस होणार आहेत.

दरम्यान, सदर स्पर्धेमध्ये आकर्षक बक्षीसांची खैरात केली असून पहिले बक्षीस रोख रू. २२०००/- व चषक, दुसरे बक्षीस रोख रू. १५०००/- व चषक, तिसरे बक्षीस रोख रू. ४०००/- व चषक तर चौथे बक्षीस रोख रू. ४०००/- व चषक असणार आहे. तसेच बेस्ट बॉलर ट्रॉफी, बेस्ट बॅट्समन ट्रॉफी, मॅन ऑफ द सिरीज ट्रॉफी आणि प्रत्येक मॅचला मॅन ऑफ द मॅच ट्रॉफी देखील असणार आहे.

अशा या भव्य क्रिकेट स्पर्धेचे स्वरूप असून याची शोभा वाढविण्याकरिता क्रीडा प्रेमी आणि चिपळूण - संगमेश्वर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार शेखर निकम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हि स्पर्धा यशस्वीरित्या पार



पाडण्याकरिता युवा नेतृत्व अनिरुद्ध शेखर निकम, राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक जिल्हा कार्याध्यक्ष सुशील भायजे, आमदार शेखर निकम यांचे स्विय सहाय्यक अमित सुर्वे,राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस समीर लोटणकर, कळंबुशीचे सामाजिक कार्यकर्ते अक्षय चव्हाण, अमोल नेटके, अमित माचीवले,रमाकांत घाणेकर, अविनाश कवळकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

तरी या बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ निमित्त क्रिकेट प्रेमिंना आनंदाची पर्वणी मिळणार असून क्रिकेट शौकीनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा असे आवाहन जय हनुमान बुरंबाड क्रिकेट क्लब मार्फत करण्यात आले आहे.

---

# शहर टाकळी ते ढोरसडे रस्त्याची दुरुस्ती करा!

## सामाजिक कार्यकर्ते शेषराव आपशेटे यांचे गटविकास अधिकारी यांना निवेदन !

**अहिल्या नगर(प्रशांत बाफना)**

**शहरटाकळी ते ढोरसडे रस्ता देखभाल व दुरुस्ती करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेषराव दगडुआप्पा आपशेटे यांनी शेवगाव गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे आज मंगळवार दि २१ रोजी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी ते ढोरसडे ह्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली आहे.**

रस्त्यावर जागो जागी खचुन मोठ मोठे खड्डे पडलेले आहे. त्यामुळे

रस्त्यावर अनेक वेळा अपघात झालेले आहेत. शाळेचे विदयार्थी, शेतकरी

तसेच अबालवृद्ध व्यक्ती या रस्त्याचा वापर करत असतात. तरी या

रस्त्याची अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात गंभीर स्वरुपाचे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने या गोष्टीची गंभीरपणे दखल घ्यावी व सदरील रस्त्याची लवकरात लवकर देखभाल व

दुरुस्ती करावी अशी मागणी शेषराव अपशेटे यांनी शेवगाव गटविकास अधिकारी यांना सदरील निवेदनाद्वारे केली आहे.

